# बालचित्रकार जयदीपच्या 'प्रौढ' जाणीवा

लहान मुलं चित्रं कशी काढतात ! याचें पहिलं उत्तर अर्थातच आंतरिक प्रेरणेनें हें येईल. पण ही आंतली प्रेरणा नेहमीच निखळ स्वरूपात प्रकट होत नाहीं. भोंवतालचें वातावरण आणि तिथलं दैनंदिन जीवन यांचा फार मोठा ठसा (अनेकदां तो अनुकरणात्मक असतो) लहान मुलांच्या चित्रावरहि दिसून येतो. कु. जयदीप महेरोत्रा हा तेरा वर्षांचा चित्रकार असाच मोठ्यांच्या कला जाणीवांनीं भारलेला वाटतो. गेल्याच आठवड्यांत त्याच्या वेधक चित्रांचें प्रदर्शन चेतना आर्ट गॅलरीत भरलं होतें.

जयदीपचें अनेक विषय त्याच्या वयाच्या कितीतरी पलिकडचे वाटतात. अर्थात त्यांची अभिव्यक्ति त्यानें अनेक बाबतींत मोठ्यांच्या तोलानेंच केली आहे. हा भाग वेगळा. उदाहरणार्थ, 'लेडी इन मूनलाइट' मधील बिनशिराची स्त्री. केवळ तिचीं वक्षस्थळेंच पांढऱ्या उठावावर रंगानें दर्शविण्याची 'समज' जयदीपच्या वयाशी पूर्णपणें विसंगत वाटते. ह्या निव्वळ नकला नव्हेत हें इथें आधींच स्पष्ट केलं पाहिजे. 'पाम–मिस्टरी' हें अशा प्रौढ चित्रकलेचें उत्तम उदाहरण.

जयदीपकडे उपजत कला आहे. आणि त्याच्या जोडीस तरल प्रतिभाहि आहे. 'विचक्राफ्ट' 'माईण्डस आय' 'दि लेडी' 'दि कॉच' हीं त्याचीं कांही उल्लेखनीय चित्रें. 'घोडा' काढतेवेळच्या त्याच्या रेषा चांगल्याच प्रवाही बनल्या आहेत. रंगाची त्याची जाणीह लक्ष वेधून घेते.

'कोलाज'मध्येंहि त्यानें कांही प्रतिभाशाली प्रयोग केले आहेत.

---

## रूपरंग

● पुष्पा त्रिलोकेकर

---

एल. एस. डी. हें त्यातील उल्लेखनीय 'कोलाज'.

जयदीप अजमेरच्या मेयो कॉलेजात आठव्या यत्तेंत शिकतो. या वयात त्यानें संपादन केलेलं चित्रकलेंतील यश कौतुकास्पद आहे. उगवत्या चित्रकारात तो निश्चित नांव मिळवील इतकी उमेद त्यानें नक्की दाखविली आहे.

●●●

